*Review Of Research*
Vol.1, Issue. 3, Dec. 2011
**ISSN:-2249-894X**
Available online at www.lbp.world

**ORIGINAL ARTICLE**

# *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार*

*प्रा. अरुण दसोडे*

*वाणिज्य विभाग प्रमुख, शिवरामजी मोघे महाविद्यालय,*
*पांढरकवडा, जि. यवतमाळ.*

***सारांश***

आपल्या कष्टाच्या जोरावर आज जगाला अन्नधान्य, भाजीपाला, फळे अशाप्रकारच्या अतीउच्च प्रतिच्या मालाचा संपूर्ण देशाचा पोशिंदा बळीराजा आत्महत्या करीत आहे. ज्याच्या जीवावर देशातील जनता जगते तोच हतबल झालेला आहे. कारण त्याच्या उत्पादनाला कवडीमोल भाव मिळत आहे. उत्पादन खर्च वगळता त्याच्या हातातच काही मिळत नाही. अनेकदा पदरमोड करुन पिकांची निगा राखावी लागते असे चित्र समोर आलेले आहे. त्या शेतकऱ्याच्या कुटुबांची झालेली दुर्दशा पाहावत नाही. त्यांनी सुदंर आयुष्याचे स्वप्न रंगवलेले असते ते वेळे आधीच पडद्याामागे जाते, समोर फक्त अंधारच दिसतो याच अंधारात चाचपडत तो प्रकाश शोधण्याचा प्रयत्न करतो, पण तो प्रकाश त्याच्या हातापासून खूप दूर असतो. तो स्वतःलाच विसरुन जातो. नकळत त्याची पावले चुकीचा मार्ग निवडतात. आज शेतकऱ्याला समस्येच्या गर्तेतून बाहेर काढून त्यांचा विकास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीधोरणाची नितांत गरज आहे. बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या कृषीधोरणाची पुर्ण विचारांनी अंमलबजावणी केली, तरच शेतकऱ्याच्या सध्याच्या परिस्थितीत बदल होणे शक्य आहे. अन्यथा जीवन संपवण्याशिवाय त्याच्याकडे दुसरा पर्याय राहणार नाही. सध्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या पिकांना बाजारपेठ नाही आणि असलीही तरी दलाल किंवा तत्सम व्यक्तीचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.

***बिजशब्द :*** पोशिंदा, राज्यघटना, खोती, शेतसारा, पदरमोड, दूरदृष्टी, सामाजिक न्याय.

***प्रस्तावना***

भारत हा कृषीप्रधान देश आहे. हे वाक्य आपल्या बालपणापासून आपल्या मनपटलावार कोरले जाते परंतु त्याच कृषीप्रधान देशाचा महत्त्वाचा घटक असलेला शेतकरी, त्याची परिस्थिती काय? याचा विचार करण्यास आपण कुठेतरी मागे पडलो असे चित्र आपल्या समोर दिसते. 'जगाचा पोशिंदा' 'जय जवान जय किसान ' हे नारे भाषणात किंवा लेखनातच शोभून दिसतात वास्तविक जीवनात हा पोशिंदा– किसान (शेतकरी) स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास असक्षम आहे. तर या शेतकऱ्याच्या परिस्थती मागे राजकीय धोरणे, नेतृत्वाचा अभाव, अज्ञानपणा, संघटनांचा अभाव अशा अनेक गोष्टी कारणीभूत आहे. अशा या परिस्थीवर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय कृषी क्षेत्राचे अध्ययन करुन अनेक उपाययोजना सांगितल्या. नदीजोड प्रकल्प यामुळे कोरडवाहू शेतीचे हरीत शेतीमध्ये कसे रुपांतर करता येईल यावर अनेक प्रबंध मांडले आहे. आंबेडकराचा हा विचार आपल्याला वर्तमान स्थितीत अमलात आणण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

***उद्दीष्ट्यो***

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार कार्याचा अभ्यास करणे.

**Title:** *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार* **Source:Review of Research [2249-894X]** *प्रा. अरुण दसोडे* **yr:2011 vol:1 iss:3**

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक कार्याचे अध्ययन करणे.
३) स्वातंत्र्योत्तर काळातील शेतीची स्थिती अभ्यासने.
४) डॉ. आंबेडकरांच्या शेतीविषयक दुरदृष्टिपणाचे अध्ययन करणे.
५) डॉ. आंबेडकरांची कृषीविषयक चळवळ अभ्यासने.
६) शेतकऱ्यांच्या समस्या जाणुन घेवून त्यावर उपाययोजना सुचविणे.

### *गृहीतकृत्ये*

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीविषयक विचारांची माहिती मिळण्यास मदत होते.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांच्या अभ्यासाची आज आवश्यकता वाटते.
३) डॉ. आंबेडकरांची कृषीविषयक चळवळीचा अभ्यास होतो.

### *तथ्यसंकलन*

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता लिखित साहित्याच्या आधारे तथ्यसंकलन केले आहे.

### *स्वातंत्र्योत्तर काळातील कृषीची स्थिती*

स्वातंत्र्योत्तर काळाचा विचार करता आज सर्वच क्षेत्रातील अनेक समीकरणे बदलली आहेत. सुरवातीच्या काळात उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी असे असणारे समीकरण मध्यंतरीच्या काळात उत्तम व्यापार, मध्यम शेती आणि कनिष्ठ नोकरी असे होते. मात्र बदलत गेलेल्या काळानुसार त्यामध्ये अमुलाग्र बदल होत गेला. सध्या हे समीकरण उत्तम नोकरी, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ शेती असे झाले आहे. एकूणच शेतीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलला आहे. तो दृष्टिकोन बदलला आहे. तो दृष्टिकोन कायम रहावा यासाठी बाबासाहेबांनी आपल्या कृषी विषयक धोरणात तशी तरतुदी करुन ठेवली आहे. हवाामानाचा लहरीपणा, बदलत असणारी पीक पद्धती, पिकांवर होणारा औषधांचा मारा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे देशभरातील मोठमोठ्याा शहरालगत उभारल्या जाणारे उद्योगधदे व त्यामुळे घटत चाललेले लागवडीखालील कृषीक्षेत्र कमी होत आहे. विशेष म्हणजे कृषी व्यवसाय अधिक भक्कमपणे उभा राहावा ही बाबासाहेबांची भूमिका होती. परंतु ती पुर्णत्वास आली नाही. यासाठी बाबासाहेबांनी १० ऑक्टोबर १९५१ मंत्रीपदांचा राजीनामा दिला हे मला याठिकाणी विशेषत्वाने सांगावेसे वाटते.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशातील जनता आर्थिक आणि समाजिकदृष्ट्याा मागासलेली होती. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा होता. शेती मागासलेली होती. शेतकरी, शेतमजुर दारिद्रयात बुडालेले होते. दीन-दलीतांच्या व्यथा त्यांनी पाहिल्या होत्या. त्यांच्यातील माणूसपण जागवण्याचं कार्य बाबासाहेबांनी केले. शेती, शेतकऱ्याचा विकास हा ग्रामीण समाज सुधारण्याशिवाय होणार नाही असे बाबासाहेबांचे मत होते.

### *शेतीविषयीचा डॉ. आंबेडकरांचा दुरदृष्टीपणा*

कृषी क्षेत्राचा विचार करतांना बाबासाहेबांनी पाण्याचे व सिंचनाचे नियोजन कसे करावे याचा आराखडा तयार केला होता. त्यावेळी ते व्हाईसरायच्या मुंबई कौन्सीलचे सदस्य होते. नद्याांना कालवे काढून दुष्काळी भागात पाणी घेवून जावे, धरण बांधून समुद्रात जाणारे पाणी अडवून त्याचा उपयोग शेतीला, उदयोगधंद्याला करता येईल. पुरात होणारी जीवीत हानी व आर्थिक हानी कशाप्रकारे टाळता येईल याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारचे लक्ष वेधले होते स्वातंत्र्य मिळून तब्बल ६५ वर्षे पूर्ण झाली तरीसुद्धा याची अमलबजावणी पुर्णतः झालेली दिसून येत नाही.

डॉ. आंबेडकरांच्या नदी जोड प्रकल्पानुसार आज देशामध्ये नदीजोड प्रकल्पाच्या जोरदार चर्चा सुरू आहेत. भविष्यात हे प्रकल्प राबविल्या जातील अशी अपेक्षा आहे. नदीजोड ही कल्पना आजची नाही तर पुढील ५०-६० वर्षानंतर देशाची लोकसंख्या किती असेल आणि त्यासाठी किती पाणी लागेल याचे नियोजन आंबेडकरांनी स्वातंत्र्यपुर्वीच केल होते. यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार हे दूरदृष्टिचे होते असे स्पष्ट होताना दिसते.

### *डॉ. आंबेडकरांची कृषी विषयक चळवळ*

शेती ही शासनाची मालमत्ता आहे आणि शेतकरी हा कसणारा हे त्यांना कधीच मान्य नव्हते. ते शेतसारा वसुलीला नेहमीच विरोध करत असत ते म्हणत, शेतातील उत्पन्नाचा विचार न करताच शेतसारा लावला जातो . ही पध्दत चुकीची आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. ही शेतसारा पदधती बंद व्हायला हवी. शेतसाऱ्याच्या आकारणीसाठी ब्रिटीशांनी नेमलेल्या कमीटीची त्यांनी भेट घेऊन साक्ष देण्याची ईच्छा व्यक्त केली होती परंतु त्यांची साक्ष टाळली. त्यांनी या संदर्भात १८ ऑगस्ट १९१५ रोजी 'केसरी' मध्ये एक लेख लिहून

शेतसारा आकारणी ही केवळ काल्पनिक उत्पन्नाच्या अंदाजावरुन आकारण्यात येते ती अन्यायकारक व गैर आहे. असे प्रतिपादन या लेखात मांडले. २४ फेब्रुवारी १९२७ रोजी मुंबई कॉन्सीलच्या विधीमंडळातही त्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विस्तृत मांडणी केली. यावेळी ते म्हणाले होते की, ''सावकार, बडे जमीनदार, पोलीस पाटील, शासन व अधिकारी हे शेतकऱ्यांना त्रास देतात. शेतकऱ्यांचा छळ करतात. हे अत्यंत वाईट आहे. शेतकऱ्यांनी जागरूक राहून आपल्या समस्येला प्रचंड ताकदीने तोंड दिले पाहिजे. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे असतील तर, शेतकऱ्यांनी संघटित झाले पाहिजे. '' त्यानुसार शेतकरी संघटित व्हायला लागले. कोकणात शेतकरी संघटीत होऊन, कोकण प्रांत शेतकरी संघ स्थापन झाला. या संघाचे नेतृत्व डॉ. बाबसाहेब आंबेडकर, नारायण पाटील, अनंतराव चित्रे, टिपणीस, शामराव पासळेकर यांनी केले होते. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषी चळवळ उभी करून शेती सुधारणेसाठी प्रयत्न चालविले होते.

### *शेतकऱ्यांच्या समस्या व त्यावरील उपाय*

शेती हा पोटापाण्याचा धंदा नाही तो राष्ट्रीय व्यवसाय आहे ते राष्ट्राच्या उत्पन्नाचे साधन आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे. उत्पादकता वाढली पाहिजे तरच देशाचे आर्थिक सामर्थ्य वाढेल, हा महत्वाचा विचार बाबासाहेबांनी मांडला.

भारतीय शेतकरी आणि त्यांच्या समोरील भांडवली तुटवडा ही मोठी समस्या आहे. असे बाबासाहेब म्हणतात. भांडवला अभावी शेतकऱ्यांच्या पुढे अनेक समस्या निर्माण होतात. कर्जबाजारीपणा वाढतो. सावाकारी फास शेतकऱ्याच्या गळ्याा भोवती पडतात. या समस्येला निवारण्यासाठी त्यांनी सामुदायिक शेतीची संकल्पना मांडली. सामुदायिक शेतीमुळे अल्पभुधारक शेतमजुर, आदिवासी, अस्पृश्य वर्ग यांना समावून घेतले जाईल त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. मजुर आणि जमीनदार हा वाद नष्ट होईल. त्यांच्यात एकोप्याची भावना निर्माण होईल अशी त्यांची भूमिका होती. कोकणातील खोती पदधतीमुळे कुळ आणि खोत यांच्यात संघर्षाचे वातावरण निर्माण झाले होते. खोत शेतकऱ्यांचे शोषण करीत होते. त्यातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबईला कायदे मंडळात खोती पद्धती बंद करुन सामान्य शेतकरी व सरकार असा थेट सबंध यावा अशी बाबासाहेबांनी मागणी केली होती. हे विधेयक म्हणजे जमीन सुधारणेच्या दृष्टिने उचलेले मोठे पाऊल होते असे म्हणावे लागेल.

### *समारोप*

सध्याची स्थिती बघता, शेतकऱ्याची दयनीय अवस्था आपणांस दिसते. तो या भांडवलशाही व्यवस्थेत स्वतःच अस्तित्व हरवून बसलेला आहे. या आर्थिक, समाजातील, राजकीय अडचणीत तो पुर्णपणे फसलेला आहे. या संकटातून बाहेर काढून, भारत महासत्ता होण्यासाठी त्याला प्रोत्साहन देणे महत्वाचे आहे. याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषीधोरणाची अमंलबजावणी करण ही काळाची गरज आहे. खऱ्या अर्थाने आज देशाला तथागत गौतम बुद्ध, महात्मा बसेश्वर, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ घटना लिहिण्याचे काम केले नाही. तर तसेच बाबासाहेबांनी देशाला जलधोरण, विजधोरण दिले. देशाची अर्थव्यवस्था उभारणींच मुलभूत कार्य केले. डॉ. बाबासाहेब जागतिक किर्तीचे अर्थतज्ञ होते. त्यात शकांच नाही मात्र त्यांच्या कृषीविषयक धोरणांची अभ्यास केला असता ते जागतिक दर्जाचे कृषीतज्ञ असल्याचं सिद्ध होते.

### *निष्कर्ष*

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीविषयक विचारांची माहिती मिळते.
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांच्या अभ्यासाची आज खरी आवश्यकता आहे.
३) डॉ. आंबेडकरांनी कृषीविषयक चळवळ उभी करून शेती सुधारण्यासाठी प्रयत्न केल्याचे लक्षात येते.
४) डॉ. आंबेडकरांचा शेतीविषयक दृष्टिकोन हा सामाजिक समतेचा असल्याचे दिसून येते.
५) कृषी व्यवसायाची स्थिती सुधारण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी धोरणे विशद केली त्यातून सामाजिक न्यायाची संकल्पना स्पष्ट होताना दिसते.

### *संदर्भग्रंथ सुची*

१. पानतावणे (संपा) डॉ. गंगाधर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९८
२. कीर धनंजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई आवृत्ती, १९८९
३. फडके भालचंद्र : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. विद्या प्रकाशन पुणे, आवृत्ती, १९८५
४. खरात प्रकाश : आंबेडकर वाद समाज आणि संस्कृत्ती, आकांक्षा प्रकाशन नागपूर, आवृत्ती, २००५
५. खरात डॉ. प्रकाश (संपा.) : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड- १, सुगावा प्रकाशन, पुणे आवृत्ती,

२००३
६. डॉ. तोष्णीवाल व प्रा. बुटे : भारतीय सामाजिक समस्या, विश्व पब्लीशर्स ॲन्ड डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर आवृत्ती, १९९७.
७. पवार दया (संपा) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशन वर्ष – १९९३
८. जाधव नरेंद्र : डॉ. आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे आवृत्ती, १९९२
९. फडके य. दि. : आंबेडकरी चळवळ, श्री. विद्या प्रकाशन पुणे, तृत्तीय आवृत्ती, २६ जानेवारी २००७
१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र–साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००२.
११. मुणगेकर डॉ. भालचंद्र : भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित : एक आंबेडकरी दृष्टिकोन, सुगावा प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली (मराठी),१५ ऑगस्ट २००५.



*प्रा. अरुण दसोडे*
*वाणिज्य विभाग प्रमुख, शिवरामजी मोघे महाविद्यालय, पांढरकवडा, जि. यवतमाळ.*